दैनिक अप्रतिम

गुरूवार दि. २७ नोव्हेंबर २०२५

# डॉ.जे.जे.मगदूम फार्मसी कॉलेजतर्फे संविधान दिनानिमित्त विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली



जयसिंगपूर (प्रतिनिधी) :

डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूर येथे संविधान दिनाच्या निमित्ताने जनजागृती रॅली आयोजित करण्यात आले. हि रॅली कॉलेजपासून ते एस.टी. स्टॅन्ड जयसिंगपूर या परिसरात काढण्यात आली. विद्यार्थ्यांचा हा प्रवाह संविधान मूल्यांचे प्रबोधन करत होता.

ही रॅली पुढे नगरपालिका जयसिंगपूर आयोजित कार्यक्रमात, एस.टी. स्टॅन्डजवळील सभास्थानी पोहोचली.

तेथे तरुण स्वयंसेवक, नागरिक आणि प्रशासनाच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे व्यापक रूप प्रकट झाले.

कार्यक्रमाचा मुख्य व प्रेरणादायी क्षण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे आणि भारतीय संविधानाच्या प्रतिचे पूजन. या प्रतीकात्मक विधीने केवळ परंपरेचा मान राखला नाही, तर देशाला दिशा देणाऱ्या मूल्यांचे स्मरण झाले.

यानंतर विविध विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी भारतीय संविधानाने दिलेल्या मुलभूत अधिकार, कर्तव्ये आणि स्वातंत्र्यांविषयी तयार केलेले विविध पथनाट्य सादर केले. प्रत्येक सादरीकरणात संविधानाने दिलेल्या अधिकारांची जाणीव दिसून येत होती.

या कार्यक्रमाला संस्था चे चेअरमन डॉ. विजय मगदूम, व्हाईस-चेअरपर्सन ॲड. डॉ. सोनाली मगदूम, कार्यकारी संचालक डॉ. सुनिल आडमुठे आणि प्राचार्य डॉ. शितलकुमार पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. प्रनील तोरस्कर, प्रा. काशिनाथ हुलवान व सांस्कृतिक कार्यक्रम विभाग प्रमुख प्रा. सौरभ समडोळे, प्रा. स्नेहल पाटील यांनी संयुक्तरीत्या केले.

## ही 'मराठा' एकवटणार?

ओबीसी प्रवर्गातील महिलेला थेट सर्वसाधारण जागेवर पक्षावकांनी उमेदवारी दिल्यामुळे शहरातील 'मराठा' एकवटण्याची शक्यता सध्या वर्तवली जात आहे.

कुरुंदवाड शहरात 'मराठा' समाजाचे मोठे मतदान आहे. त्यामुळे एकजूट ठेवून मराठा समाज सत्तेच्या चाव्या आपल्या ताब्यात ठेवेल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.